दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः संकीर्ण १५१९/प्र.क्र.११५/६अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक: २२ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
२. आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र.७/तक्रार निवारण/अधिकारी/नियुक्ती/क-२०/२०१७-१८/२२ दि.२०/६/२०१७

प्रस्तावना :-

सर्वोच्च न्यायालयातील दाखल रिट याचिका क्र.११६/१९९८ जस्टीस सुनंदा भंडारी विरुध्द युनियन ऑफ इंडीया व इतर प्रकरणी मा.सवोच्च न्यायालयाच्या दि.१८/९/२०१८ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३(२) मधील तरतुदीनुसार उक्त अधिनियमातील कलम २० च्या अनुषंगाने शासकीय सेवेमध्ये असताना संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अपंगत्वाच्या कारणास्तव उद्भवणाऱ्या सेवाविषयक समस्यांचे निराकरण होण्यासाठी शासनाच्या प्रत्येक आस्थापनेवर तक्रार निवारण अधिकारी नियुक्त होणे आवश्यक आहे. उक्त प्रयोजनाकरिता गट-अ मधील अधिकाऱ्याची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे आयुक्त (अपंग कल्याण)महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक २०.०६.२०१७ च्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे व सर्व कृषि विद्यापीठे यांचे अधिनस्त कार्यालयातील विभाग/जिल्हा स्तरावरील कार्यालयात तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन आदेश :-

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे व सर्व कृषि विद्यापीठे यांचे अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्यांचे निराकरण होण्यासाठी गट-अ मधील खालील अधिकाऱ्यांची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	कार्यालय	कार्यक्षेत्र	तक्रार निवारण अधिकाऱ्याचे पदनाम
१.	महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे	राज्यस्तर	महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे
२.	डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली	विभागस्तर	कुलसचिव,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
३.	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी	विभागस्तर	कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी

४.	डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला	विभागस्तर	कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
५.	वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी	विभागस्तर	कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

२. उपरोक्त तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार तक्रार रजिस्टर ठेवणे, तक्रारींचा निपटारा करणे व अधिनियमान्वये निर्धारित केलेली अन्य जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२२१२३३५९९९०१ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.08.22 12:42:00 +05'30'

(सु.सं.धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महासंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे
७. आयुक्त (अपंग कल्याण), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. कुलगुरु/कुलसचिव,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
९. कुलगुरु/कुलसचिव,महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी
१०.कुलगुरु/कुलसचिव,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
११.कुलगुरु/कुलसचिव,वंसतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
१२.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१३.निवड नस्ती/६अे